महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/ २८५६ /२०२५-२६ दिनांक - २५/०९/२०२५

# -: परिपत्रक :-

**विषय : मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथे ओबीसी प्रवर्गातील रिक्त जागांसाठी प्रतीक्षा यादीतून निवड झालेल्या विद्यार्थीनींना प्रवेशाबाबत सूचना.**

शासन निर्णय क्रमांक: वसति ५३१७/प्र.क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलीचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी, पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा लक्षीत गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपुर मार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या गटातील ७५ मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशा प्रकारे लक्षित घटकातील एकूण २०० मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यात आलेले आहे. त्यानुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती मार्फत मातोश्री वसतिगृहातील एकूण ७५ जागांपैकी रिक्त १३ जागांकरिता दि.२२/०७/२०२५ रोजी ते दि.१०/०८/२०२५ या कालावधीत अर्ज मागविण्यात आले होते.

त्यानुषंगाने महाज्योती कार्यालयाच्या अटी व शर्ती नुसार निवड व प्रतीक्षा यादी तसेच अपात्र विद्यार्थीनींची यादी दि.१०/०९/२०२५ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच निवड झालेल्या विद्यार्थीनींना दि.११/०९/२०२५ ते १७/०९/२०२५ पर्यंत वसतिगृहात प्रवेश निश्चित करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार दिनांक १७/०९/२०२५ पर्यंत ज्या विद्यार्थीनींनी वसतिगृहात प्रवेश निश्चित केलेला नाही अशा विद्यार्थीनींचा प्रवेश रद्द करण्यात आला असून त्यांच्या जागी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थीनींची निवड करण्यात आलेली आहे. सदर प्रतीक्षा यादी या परिपत्रकासह महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

निवड झालेल्या पात्र विद्यार्थीनींना वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. पात्र विद्यार्थीनींनी आपला प्रवेश **हा दि.२६/०९/२०२५ ते दि.२७/०९/२०२५** या कालावधीत लेखी स्वरुपात अर्ज, वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र व प्रवेशित शैक्षणीक वर्षाचे मूळ बोनाफाईड जमा करुन प्रवेश निश्चित करून घ्यावे. ज्या विद्यार्थीनी **दि. २७/०९/२०२५** पूर्वी प्रवेश निश्चित करणार नाही अश्या विद्यार्थीनींचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

२. सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये भविष्यात काही त्रूटी/अडचणी उदभवल्यास अश्या विद्यार्थीनींचा प्रवेश रद्द करण्यात येईल.
३. वसतिगृहात प्रवेश घेतेवेळी अद्ययावत (latest) सक्षम प्राधिकाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.
४. पात्र विद्यार्थीनींना व त्यांच्या पालकांना वेळोवेळी वसतिगृहाकडून निर्गमीत करण्यात येणारे हमीपत्र हे लेखी स्वरुपात भरुन देणे बंधनकारक आहे. तसेच महाज्योती व सारथी कार्यालयाच्या अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
५. कोणत्याही टप्प्यावर अंतिम निर्णय घेण्याचा व त्यात आवश्यक बदल करण्याचा अधिकार हा महाज्योती संस्था प्रशासनाचा राहील व तो विद्यार्थीनींना बंधनकारक राहील.

स्वा/-
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर**